आमदार
विधानपरिषद सदस्य

सत्यमेव जयते

हरिभाऊ राठोड
आमदार (MLC)
माजी खासदार
लोक सभा
मोबाईल : ९९२०७१६९९९
टेली फॅक्स : ०२२ २५६८६६९९

# बढती मधील आरक्षण प्रकरण आणि गोंधळाची स्थिती ;

बढती मधील आरक्षणाबाबत वेगवेगळ्या उच्च न्यायालयात व सर्वोच्य न्यायालयात एम.नागराज प्रकरणी, संपूर्ण देश भर गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली असून,हे प्रकरण आता सात न्यायाधीशाच्या घटनापीठाकडे सुनावणीस येणार आहे, सर्वोच्च न्यायालयाने सरकारी नोकरीत, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींना आरक्षणा संबधीच्या आपल्या २००६ सालच्या आदेश विरोधात, अंतरिम आदेश देण्यास दि. ११ जुलै २०१८ रोजी नकार दिला, सरन्यायाधीश दीपक मिश्रा यांनी हे प्रकरण सात सदस्यच्या घटनापीठाकडे वर्ग करत असल्याचे सुतोवाच केले. केंद्र सरकारने बढती मधील विविध निकालामुळे पदोन्नती आणि नोकऱ्या रखडल्याचे स्पष्ट करीत, या प्रकरणी तात्काळ सुनावणी घेण्याची मागणी केली. सर न्यायाधीश मिश्रा व न्यायमूर्ती एम.एम. खानविलकर, आणि न्यायमूर्ती डी.वाय. चंद्रचूड यांच्या खंडपीठा समोर, याप्रकरणी सुनावणी ११ जुलै २०१८ रोजी झाली. न्यायालयाने २००६ सालच्या एम.नागराज निर्णयावर, पुनर्विचार करण्यासाठी सात न्यायमूर्ती घटनापीठाची आवशक्यता आहे, असे प्रतिपादन केले.

**एम.नागराज प्रकरण काय आहे हे बघूया :-** एम. नागराज प्रकरणामध्ये घटनापिठाच्या पाच न्यायमूर्तीनी २००६ साली असा निर्णय दिला होता कि, साविधानाचे कलम १६(४) अ आणि १६(४) ब ह्या दुरुस्त्या वैद्य ठरविले होते.परतू एस.सी, एस.टी ना क्रिमीलीअर या संज्ञेत आणावे, आणि मागासलेपणा तसेच योग्य प्रतिनिधित्व आहे, किवा कसे, हे त्या त्या राज्यांनी ठरवावे, त्याच प्रमाणे घटनेच्या कलम ३३५ प्रमाणे प्रशासकीय कार्यक्षमतेवर परिमाण होणार नाही हे बघावे असा निकाल दिला होता.व त्यानंतर विविध उच्च न्यायालयाने या सूचनेचा वेगवेगळे अर्थ काढून, बढती मधील आरक्षणाला टाच लावली होती. व त्यानंतर सातत्याने बढती मधील आरक्षणाच्या बाबतीत गोंधळाची परिस्थिती निर्माण झालेली आहे. या बाबतीत विषय अधिक स्पष्ट व्हावा, म्हणून हा लेख प्रपंच ........

## सर्वोच्य न्यायालयाने चुकीचा अर्थ काढल्यामुळे, करोडो कर्मचाऱ्यानवर अन्याय :-

भारतीय संविधाना नुसार बढती मधील आरक्षणाची स्पष्ट पणे तरतूद अनुसूचित जाती आणि जमाती साठी घटनेचे कलम १६(४अ) व १६(४ब) नुसार केलेली आहे, असे असतांना सर्वोच्य न्यायालयाच्या एम.नागराज प्रकरणी पाच न्यायधीशांच्या संविधानिक खंडपीठाने कशाच्या आधारावर बढती मधील आरक्षण, बंद करण्याचे आदेश दिले ? हा एक संशोधनाचा विषय बनला आहे.



E-mail : haribhaurathod@gmail.com • Website: www.haribhaurathod.com

मुंबई : ए-२०१, बंजारा हिल, बाबासाहेब नाईक सोसायटी, अशोक नगर पोलीस स्टेशन जवळ, मुलुंड (वे), मुंबई-८० टेली- 25686699 मोबाईल : 09868180458, 09920716999
यवतमाळ : अश्विनी टॉवर, डरवाहा रोड, यवतमाळ. महाराष्ट्र - ४४५००१. टेली - 07232-256333, 256010

आमदार
विधानपरिषद सदस्य

सत्यमेव जयते

हरिभाऊ राठोड
आमदार (MLC)
माजी खासदार
लोक सभा
मोबाईल: ९९२०७१६९९९
टेली फॅक्स: ०२२ २५६८६६९९

याच ठिकाणी सर्वोच्य न्यायालयाने चुकीचा निष्कर्ष काढल्यामुळे करोडो कर्मचारी अधिकाऱ्याचे बढती मधील आरक्षण रखडले आहे, आणि त्याचा परिणाम आरक्षणा मधील बॅकलॉग भरण्यास राज्य सरकारांना अडचणी निर्माण झाल्या आहे. पर्यायाने सविधांनाने बहाल केलेले, समान संधी आणि सामाजिक न्याय, या तत्वापासून आपण दूर जात आहोत, या ठिकाणी आनखी एक गोष्ट आवर्जून नमूद करावीसी वाटते, ती अशी की सर्वोच्य न्यायालयाने चुकीचा अर्थ काढून या प्रकरणी निर्णय दिला तोच धागा पकडून विविध उच्च न्यायालय बढती मधील आरक्षणाला स्थगिती देत आहेत.

**सर्वोच्य न्यायालयाच्या एम.नागराज प्रकरणी न्यायालयाने जो निष्कर्ष काढला आहे तो पुढील प्रमाणे:-**

**" एम.नागराजन प्रकरणी सर्वोच्य न्यायालयाने आपले निष्कर्ष काढतांना, काय म्हटले आहे ते बघणे आवश्यक आहे. निष्कर्षात म्हटले आहे की, "ज्या संदर्भीय घटना दुरुस्तीद्वारा घटनेमध्ये कलम १६(४अ) व १६(४ब) घातले गेले आहेत, <u>ती घटना दुरुस्ती घटनेच्या कलम १६ (४) मधूनच उत्पन्न झाली आहे.</u> घटनेच्या कलम ३३५ या अंतर्गत राज्य शासनाची कार्यक्षमता ध्यानात घेऊन राज्य शासनाला ज्या घटकामुळे आरक्षणाची तरतूद करता येते, ते घटक किंवा कारणे या घटना दुरुस्ती मुळे, कायम राहते. कारणे किंवा घटक म्हणजे मागासलेपणा व पुरेसे प्रतिनिधित्व नसणे. ज्या संदर्भित घटना दुरुस्तीद्वारा घटनेत सदर १६(४ अ) व १६(४ ब) घातले गेलेत आहेत, ती घटना दुरुस्ती, घटनेच्या कलम १६(४) ची संरचना बदलत नाही. सदर संदर्भित घटना दुरुस्त्या फक्त अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती पुरत्याच मर्यादित आहेत. त्यामुळे घटनेची कोणतेही प्रावधाने नाश पावत नाहीत. किंवा लोप पावत नाहीत".**

## <u>संविधानाचे कलम १६(४) सी बढती प्रकरणी संबंध जोडणे चुकीचे</u>

वर उल्लेखित १६(४) हे कलम खऱ्या अर्थाने राज्यासाठी आणि इतर समाजाच्या मागास वर्गासाठी म्हणजेच, एस.सी, एस.टी व्यतिरिक्त मागास घटकासाठी आहे. (भटके विमुक्त, परंपरागत व्यवसायी ) आणि त्या मुळे ती घटना दुरुस्ती घटनेच्या १६(४) मधून उत्पन्न झालेली आहे, असे म्हणणे सपशेल चुकीचे आहे.या कलमाचा आणि एस.सी, एस.टी या घटकाचा सुत्रामही संबंध नाही, या कलमा विषयी संविधान सभेमध्ये दि.३०/११/१९४८ साली चर्चा चालू असताना, श्री टी.टी.कृष्णमचारी यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना विचारले होते की, डॉ भीमरावजी मागासवर्गीय म्हणजे काय ? त्यावेळेस डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी असे स्पष्ट केले होते की, "एखाद्या राज्याच्या मते, त्यांना वाटत असेल की, एखादा नागरिकांचा मागासवर्ग हा सुद्धा मागासलेला आहे, आणि त्याला शासन व्यवस्थेमध्ये (विशेषतः नोकरी आणि शिक्षणामध्ये) योग्य प्रतिनिधित्व मिळालेले नाही, तर त्यांच्यासाठी काही पदे राखीव ठेवण्यात काही हरकत नसावी." त्याच वेळेस डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी हेही स्पष्ट केले होते की, **"या कलमाअंतर्गत मागासवर्ग ठरवण्याची राज्य शासनाला संपूर्ण अधिकार दिलेला आहे."याचाच अर्थ असा कि जो समाज घटक राज्याअतर्गत मागास असेल,तो समाज घटक, केंद्रीय सूचीमध्ये मागास असेलच असे नाही".**



E-mail : haribhaurathod@gmail.com • Website: www.haribhaurathod.com

मुंबई : ए-२०१, बंजारा हिल, बाबासाहेब नाईक सोसायटी, अशोक नगर पोलीस स्टेशन जवळ, मुलुंड (वे), मुंबई-८० टेली- 25686699 मोबाईल : 09868180458, 09920716999
यवतमाळ : अश्विनी टॉवर, डरवाहा रोड, यवतमाळ, महाराष्ट्र - ४४०००१ . टेली - 07232-256333, 256010

हरिभाऊ राठोड
आमदार (MLC)
माजी खासदार
लोक सभा
मोबाईल: ९९२०७१६९९९
टेली फॅक्स: ०२२ २५६८६६९९

संविधान सभेमधील वरील चर्चा लक्षात घेता, हे स्पष्ट आहे की, संविधानाच्या कलम १६(४) चा आणि अनुसूचित जाती, जमातीचा काहीही संबंध नाही, विधी व न्यायदानाच्या बाबतीत, एक गोष्ट अशी मानली जाते ती अशी की, संविधानाच्या कलमाचा अर्थ लावायचा असेल तर, त्या वेळेस त्या कलमावर झालेली चर्चा , आणि भाषणे, बघितली जातात, व त्यानुसार सर्वोच्य न्यायालये आणि उच्य न्यायालये अर्थ काढीत असतात.त्याच प्रमाणे एखाद्या कायद्याच्या बाबतीत अर्थ काढण्याच्या संदर्भात वाद निर्माण झाला असेल तर, न्यायालय तो संबंधित कायदा मंजूर करताना,( विधिमंडळ किवा संसदेत) त्या कायद्याच्या बिलाला जोडण्यात आलेले उद्देश आणि कारणे तपासली जातात. त्याच प्रमाणे या प्रकरणात सुद्धा, आरक्षणाचा उद्देश स्पष्ट आहे की, आरक्षणाच्या तरतुदींच्या उद्देशाची पूर्तता करण्यासाठी आणि आरक्षणाचे तत्व, समान संधी, आणि सामाजिक न्याय या साठी आरक्षण दिले गेले आहे. आणि ते सविधानात्मक आहे. त्यामुळे कायद्याचे किस काढण्यामध्ये, आणि अर्थाचे अनर्थ करण्यामध्ये न्यायालयांनी वेळ घालवू नये. आणि मागासवर्गीयानवर अन्याय करू नये. असे प्रामाणिक पणे वाटते.

दोन्ही बाजूच्या विद्वान वकिलाला आणि पर्यायाने न्यायालयाला आमची नम्र विनंती आहे की, आम्ही न्यायालयात उभे राहून, उलट तपासणी घेऊ शकत नाही,परंतु आम्ही सर्व तज्ञ मंडळीला न्यायदानासाठी विनंती जरूर करू शकतो.

**कृपया खालील बाबींचा विद्वान,तज्ञ वकिलांनी नीट अभ्यास करावा.**

(१) संविधानाचे कलम १६(४)हे कोणासाठी आहे ? जर हे कलम इतर समाजाच्या मागास वर्गासाठी असेल तर, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती बरोबर या कलमाचे सांगड घालणे बरोबर आहे काय ?

(२) मागासलेपणा सिद्ध करण्यासाठी अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती यांना संविधानाचे कलम ३४१ आणि कलम ३४२ नुसार संबंधित राज्यांनी मागासलेपनाची म्हणजेच, अनुसूचित जाती, जमाती या संदर्भात असलेल्या सर्व कसोट्या पूर्ण केल्यानंतर आणि संबंधित राज्याच्या मा.राज्यपालांच्या शिफारशी नुसार आणि , मा.राष्ट्रपतींच्या मान्यतेने त्यांचा अनुसूची मध्ये समावेश झालेला आहे **( they are deemed to be backward)**

(३) वरील बाबी वरून एस.सी, आणि एस. टी ना मागासलेपणा सिद्ध करण्याची आवश्यकता नाही, या करिता पुढील उदाहरण ध्यानात घ्यावे, ते असे जर दहा वर्षां पूर्वी एस.सी च्या जागेवर लिपिक या पदावर लागलेल्या एखाद्या कर्मचाऱ्याला, आज त्यांच्या रोष्टर प्रमाणे वरिष्ठ लिपिक या पदावर, आरक्षण देत असेल तर, त्याला आपण तुम्ही मागासवर्ग आहात काय ? असे कसे विचारू शकतो ? किंवा असे राज्य सरकारला विचारणे हे बरोबर आहे काय ? न्यायालयाच्या न्यायदानाच्या पारड्यामध्ये , हे प्रकरण कसे काय तोलता येईल ? याचा पुनश्च एम.नागराज प्रकरणी विचार व्हावा.



E-mail : haribhaurathod@gmail.com • Website: www.haribhaurathod.com

मुंबई : ए-२०१, बंजारा हिल, बाबासाहेब नाईक सोसायटी, अशोक नगर पोलीस स्टेशन जवळ, मुलुंड (वे), मुंबई-८० टेली- 25686699 मोबाईल : 09868180458, 09920716999
यवतमाळ : अश्विनी टॉवर, डरवाहा रोड, यवतमाळ. महाराष्ट्र - ४४०००१ . टेली - 07232-256333, 256010

आमदार
विधानपरिषद सदस्य

सत्यमेव जयते

हरिभाऊ राठोड
आमदार (MLC)
माजी खासदार
लोक सभा
मोबाईल: ९९२०७१६९९९
टेली फॅक्स: ०२२ २५६८६६९९

(४) राज्य शासनाच्या अखत्यारीतील आस्थापना मध्ये जर, बॅकलॉग असेल तर, तो भरून काढण्यासाठी न्यायालयांनी उपाययोजना किंवा स्कीम सुचवावी, जेणे करून संविधानाच्या, सामाजिक न्याय या तत्वाला सुसंगत असा कायदा बनवता येईल.आणि संविधानाने बहाल केलेले मुलभूत हक्क आबाधित राखता येईल.

(५) क्रिमीलिअर हि संज्ञा इंद्रा साहनी विरुद्ध भारत सरकार या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयांनी ओबीसी साठी घालून दिली होती. त्यांनी त्यावेळेस जस्टीस रामानंद प्रसाद यांच्या अध्यक्षतेखाली उच्चधिकार समिती नेमण्यात आली होती. आणि केवळ ओबीसी साठी आणि सरळ सेवेने भरतीसाठी आणि शिक्षणामध्ये लाभ घेण्यापुर्ती मर्यादित होती, त्यामुळे क्रिमीलीअर आणि बढती यांचा काहीही संबंध नाही. कारण ओबीसींना बढती मधील आरक्षण लागू नाही,आणि एस.सी, एस.टी साठी तर याचा मुळीच संबंध नाही. कारण एस.सी, एस.टी समाजाला एक वेगळा स्टीग्मा लागलेला आहे, आणि तो कायमचा आहे, कधीही पुसल्याजात नाही, हाच मुद्दा प्रसाद कमिटीने ध्यानात घेवून, भटक्या विमुक्तांनाही क्रिमिलिअर मधून वगळण्याची शिफारस केली होती,व यामुळे एस.सी, एस. टी यांना क्रिमिलिअर लागू होत नाही. आणि त्यातला त्यात बढती मध्ये क्रिमिलिअर लावण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

## केंद्राचे आदेश राज्य सरकार मानीत नाही ; देशात विचित्र परिस्थिती

सर्वोच्च न्यायालयाने ५ जून २०१८ रोजी बढती मधील आरक्षणाच्या, एका प्रकरणात असे निर्देश दिले होते कि, केंद्र सरकारने बढती मधील आरक्षण पूर्वीप्रमाणे चालू ठेवावे, परंतु ते सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निकालाच्या अधीन राहून असावे. हे करत असतांना कायद्यानुसार बढती मधील आरक्षण देण्यात यावे. या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार मा.पंतप्रधान नरेंद्र मोदीने तातडीने कॅबीनेट मध्ये निर्णय घेवून, पत्रकार परिषदेमध्ये केंद्रीय मंत्री रामविलास पासवान यांनी आरक्षण जारी असल्याचे सांगितले, आणि केंद्र सरकारच्या डी.ओ.पी.टी विभागाने परिपत्रक जारी करून, बढती मधील आरक्षण देण्याबाबत केंद्रा सह सर्व राज्यांना कळविले, परंतु महाराष्ट्र, मध्यप्रदेश आणि उत्तर प्रदेश या राज्यात भाजपची सत्ता असून देखील, राज्य सरकार बढती मधील आरक्षण देण्यास टाळाटाळ करीत आहे. याचाच अर्थ पंतप्रधान नरेंद्र मोदीचा आदेश देवेंद्रजी फडणवीस मानीत नाही, हे स्पष्ट होत आहे.

**बढती मधील आरक्षणाची आवशक्यता का ? :-** साविधानामध्ये सन २००० व २००२ मध्ये क्रमशः कलम १६(४) अ आणि १६ (४) ब हे कलम घटना दुरुस्ती करून घातले गेले. परंतु प्रमोशन पॉलीसी हे त्या आधीच १९७४ पासून केंद्र आणि विविध राज्यामध्ये चालू करण्यात आली, याचे कारण असे कि, वर्ग २, वर्ग १ आणि इतर पदामध्ये जेव्हा मोठ्या प्रमाणामध्ये बॅकलॉग दिसायला लागला, तो भरून काढण्यासाठी, केवळ सरळ सेवा भरतींनी हा बॅकलॉग भरणे, शक्य नव्हते कारण, पदे भरण्याची जी नियमावली, वेगवेगळ्या प्रशासनामध्ये तयार करण्यात आली होती.



E-mail : haribhaurathod@gmail.com • Website: www.haribhaurathod.com

मुंबई : ए-२०१, बंजारा हिल, बाबासाहेब नाईक सोसायटी, अशोक नगर पोलीस स्टेशन जवळ, मुलूंड (वे), मुंबई-८० टेली- 25686699 मोबाईल : 09868180458, 09920716999
यवतमाळ : अश्विनी टॉवर, डरवाहा रोड, यवतमाळ. महाराष्ट्र - ४४०००१. टेली - 07232-256333, 256010

आमदार
विधानपरिषद सदस्य

सत्यमेव जयते

हरिभाऊ राठोड
आमदार (MLC)
माजी खासदार
लोक सभा
मोबाईल: ९९२०७१६९९९
टेली फॅक्स: ०२२ २५६८६६९९

त्यामध्ये ५०% हे सरळ सेवा आणि ५०% हे बढतीने भरण्याचे नियम तयार केले गेले होते. यामुळे बढती मध्ये, सामाजिक आरक्षण ठेवण्यात आले, आणि त्यासाठी रोस्टर पद्धती अवलंबवली गेली. याचाच अर्थ असा कि, प्रशासनीक गरज म्हणून, आणि निर्माण झालेला बॅकलॉग भरून काढण्यासाठी हि, एक प्रकारची स्कीम आहे. आणि म्हणूनच बढती मधील आरक्षणाचा जन्म झाला. (प्रमोशन पॉलीसी)

याठिकाणी विशेष उल्लेखनीय आणि नोंद घेण्यासारखी बाब म्हणजे सर्वोच्य न्यायालयाच्या सबरवाल प्रकरणी, दिलेल्या निर्देशानुसार एकदा बॅकलॉग भरला गेल्यास, आपोआपच बढती मधील आरक्षण थांबवता येते. या नंतर ओपन टू ओपन आणि बॅकवर्ड टू बॅकवर्ड अशी पॉलीशी चालू होईल.परंतु आणखी असे कि, वरिष्ठता तत्वानुसार एखादा मागास कर्मचारी/ अधिकारी बढतीस पात्र राहील.

**बढती मधील आरक्षणाचा कोटा किती ? :-** खरे तर,मागासवर्गीयांच्या विरोधकांनी हे समजून घेतले पाहिजे कि, केंद्रा मध्ये फक्त २२.०५ % तर महाराष्ट्रात फक्त ३३% बढती मधील आरक्षण दिल्या जात आहे. याचाच अर्थ केंद्रात खुल्या वर्गासाठी जवळपास ८०% आणि महाराष्ट्रात ६७% जागा या खुल्या वर्गासाठी राहतात. सामाजिक न्यायचे तत्व हे सांगते कि, मागासवर्गीयांना सुद्धा योग्य प्रतिनिधित्व मिळायला पाहिजे.तरच आपण संविधानाच्या प्रास्ताविकामध्ये म्हटल्या प्रमाणे समान संधी व सामाजिक न्याय दिले असे होईल. आजच्या घडीला केंद्रात फक्त १५% बॅकलॉग भरल्या गेला आहे,हा बॅकलॉग पूर्णपणे भरून काढण्यासाठी, बढती मधील आरक्षणाशिवाय पर्याय नाही.

**वरील प्रमाणे हे माझे मत आहे, आणि मी ठाम आहे की सर्वोच्य न्यायालय याच ठिकाणी चुकले आहे, आता दोन्ही बाजूच्या तज्ञ वकिलांना, माझी विनंती आहे की, हा तिढा आपण सोडवावा, अन्यथा सरकारने घटना दुरुस्ती करावी, हाच एक मार्ग दिसतो. सर्वोच्य न्यायालयाचे पूर्वीचे निवाडे, विविध उच्च न्यायालयाचे निवाडे आणि सद्यस्थिती जर, बघितली तर, बढती मधील आरक्षणा मध्ये, प्रचंड गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली आहे.**



**---- हरिभाऊ राठोड**
**विधानपरिषद सदस्य,**

E-mail : haribhaurathod@gmail.com • Website: www.haribhaurathod.com

मुंबई : ए-२०१, बंजारा हिल, बाबासाहेब नाईक सोसायटी, अशोक नगर पोलीस स्टेशन जवळ, मुलुंड (वे), मुंबई-८० टेली- 25686699 मोबाईल : 09868180458, 09920716999
यवतमाळ : अश्विनी टॉवर, डरवाहा रोड, यवतमाळ. महाराष्ट्र - ४४५००१. टेली - 07232-256333, 256010